सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात लेखाशिर्ष क्र.२४२५ १३४१, २१ साहित्य व पुरवठा या उद्दिष्टाखाली रु.५५.९३ लक्ष इतका निधी वितरित व खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**शासन निर्णय क्र. सपववि-४००१२/२५/२०२५/DESKSERICULTURE**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दि. २० मार्च, २०२६.

**वाचा :-**

१) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक : पुरक-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३ दि.०७.०४.२०२५.

२) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक : पुरक-२०२५/प्र.क्र.६५/अर्थ-३ दि.१४.०७.२०२५.

३) संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्र. जा.क्र.रे/का-२/ले-१/२१ साहित्य व पुरवठा/२५/४२, दि.१४.०१.२०२६.

**प्रस्तावना :-**

वाचा मधील अ.क्र. ३ येथील दि.१४.०१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर यांनी विनंती केल्याप्रमाणे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात तुती व टसर बीज कोष खरेदी साठी (रेशीम शेतकरी यांना देण्यात येणारे अंडीपुंज निर्मिती करण्याकरिता आवश्यक) तसेच रिलिंग कोष खरेदीसाठी (रेशीम धागा निर्मितीकरिता आवश्यक) रु.५५.९३ लक्ष इतका निधी लेखाशिर्ष क्र.२४२५ १३४१, २१-साहित्य व पुरवठा उद्दिष्टाखाली वितरित व खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात तुती व टसर बीज कोष खरेदी साठी (रेशीम शेतकरी यांना देण्यात येणारे अंडीपुंज निर्मिती करण्याकरिता आवश्यक) तसेच रिलिंग कोष खरेदीसाठी (रेशीम धागा निर्मितीकरिता आवश्यक) रु.५५.९३ लक्ष इतका निधी लेखाशिर्ष क्र.२४२५ १३४१, २१-साहित्य व पुरवठा उद्दिष्टाखाली अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) विहित कार्यपद्धतीने वितरित व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खरेदीसाठीचे वितरीत करावयाच्या देयकांची द्विरुक्ती होणार नाही तसेच निधी विहित कार्यपद्धतीने खर्च करण्याची संपूर्ण जबाबदारी संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर यांची राहील.

३. सदरचा खर्च हा “मागणी क्र.व्ही-२, २४२५-सहकार, ००१ संचालन व प्रशासन, (०१) संचालन व प्रशासन, (०१) (१३) रेशीम संचालनालय (अनिवार्य) (२४२५ १३४१), २१-साहित्य व पुरवठा” या लेखाशीर्षाखाली सन २०२५-२६ मध्ये उपलब्ध असलेल्या निधीमधून खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका (भाग-१) १९७७ मधील परिच्छेद १४२ मधील तरतुद, वाचा मधील अ.क्र. २ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रक, दिनांक १४.०७.२०२५ मधील तरतुदीनुसार प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेले अधिकार तसेच वित्त विभागाच्या, अनौपचारिक संदर्भ क्र.१२९/२०२६/व्यय-२, दि.२८.०२.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३२०१२२००१४८०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by PAWAR TUSHAR PITAMBAR
Date: 2026.03.20 12:20:49 +05'30'

**(डॉ.तुषार पवार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत:-**

१) मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर.
३) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षण/लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
४) उप सचिव (व्यय-२/अर्थ-१३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सहायक संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर/पुणे.
६) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, गडहिंग्लज, कोल्हापूर.
९) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१, आरमोरी, जि. गडचिरोली.
१०) निवडनस्ती (रेशीम कक्ष)